# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 28/07/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 18 कि. मी. अंतरावरील कोंढासावळी येथे दिनांक 16/07/2021 चे 22.00 वा. दरम्यान निर्मला राणपतराव डोंगरदिवे(मृतक), वय 49 वर्ष, रा. कोंढासावळी हिला तिन चार वर्षापासुन मानसिक आजार होता. मृतक हिने उंदिर मरण्याचे औषध प्राशन केल्याने तिची प्रकृत्ती खराब झाल्याने तिला उपचारकरीता प्रथम ग्रामीण रुग्णालय काटोल व नंतर मेडीकल पोलिस बुथ नागपुर येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितेश राणपतराव डोंगरदिवे, वय 25 वर्ष, रा कोंढासावळी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे मो. न. 9011026414 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा कमलेश कॉलनी बाजारगाव येथे दिनांक 27/07/2021 चे 09.00 वा. दरम्यान मनसाराम फुस्सु धुर्वे (मृतक), वय 40 वर्षे, रा.छिंदवाडा म.प्र. हमु.कमलेश कॉलनी बाजारगाव हे कमलेश कॉलनी येथे सुरू असलेल्या बांधकामावर काम करण्याकरीता गेले असता वर असलेल्या इलेक्ट्रीक तारावर पडलेली सेंट्रींगची पाटी बाजुला करण्यारीता गेले असता त्यांना ईलेक्ट्रीक करंट लागल्याने ते जागीच बेशुध्द पडले. त्यांना उपचाराकामी मेडीकल कॉलेज, नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुण मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– साहील कमलेश यादव, वय 25 वर्षे, रा.कमलेश कॉलजी बाजारगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा सुनिल बन्सोड मो. नं. 9764090208 हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील वार्ड क्र. 1, आमडी येथे दिनांक 26/07/2021 चे 18.00 वा. दरम्यान सौ. आशा आम्रपाल बोरकर(मृतक), वय 32 वर्ष, रा. आमडी हि घरासमोरील इलेक्ट्रीक लाईनवर घरी लाईन घेण्याकरीता वायर टाकीत असतांना तिच्या हाताला करंट लागल्याने तिचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आम्रपाल बुध्दप्रसाद बोरकर, वय 32 वर्ष, रा. आमडी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोशि मारबते मो.नं. 9011264765 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर